वि. दि. दावा क्र. ५१३-२०२३
निशाण क्र. १०२

**प्रतिवादी १ ते ३ तर्फे सा.क्र. ३ यांना शपथ देण्यात आली.**

**नाव – अमीत शशिकांत मेक्कलकी, वय– ३९ वर्षे,**

**व्यवसाय – छायाचित्रण**

**रा. घोलप नगर, करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर.**

**<u>प्रतिवादी १ ते ३ तर्फे साक्षीदार क्र.०३ यांची सरतपासणी प्रतिवादी १ ते ३ तर्फे वकील श्री. बी.टी.देवी यांचे तर्फे शपथेवर सुरु –</u>**

माझे दुकानचे पद्या कलर फोटो स्टुडीओ या नावाने आहे. दुकानचे प्रोपरायटर माझे वडील होते आता मी आहे. मी माघील सोळा वर्षापासुन काम करतो. मी प्रतिवादी चिंचकर यांना ओळखतो. प्रतिवादी हे माझेकडे दि.१७/०८/२०२३ रोजी जागेचे फोटो काढायचे सांगण्यासाठी आले होते. सदर जागा ही जमिन होती. त्यांनी मला फोटा काढायला सांगितले होते. आता मला आर्टिकल अं दाखविले. ही तीच पावती आहे. ज्या माध्यमातून त्यांनी मला फोटो काढायला सांगितले होते. ज्यावेळी मला फोटो काढण्यासाठी सांगितले होते त्यावेळी बळीराम चिंचकर व देवकर तेथे आले होते. मला मिळालेल्या ऑर्डवरती देवकर यांची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असून माझे हस्ताक्षरात आहे. त्या दस्तावरती माझे दुकानचा शिक्का व माझी सही आहे. त्यास **निशाण क्र.१०३** देण्यात येत आहे. आता मला अभिलेखावरील सहा फोटो दाखविले ते मीच काढलेले आहेत. मी गट नं.१९९ मध्ये फोटो काढले होते. मी प्रत्येक फोटोच्या माघे मजकुर लिहिलेला आहे. त्या फोटोच्या पाठीमाघील बाजुस माझे दुकानचा सही व शिक्का आहे. सदर मजकुर माझे हस्ताक्षरात लिहिलेला आहे. मी ते फोटो प्रतिवादी यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे काढलेले आहेत. मी ते फोटो रस्त्याचे काम व ड्रेनेज लाईनची अवस्था दाखविणेकामी केलेली आहे. मला तेथे काम चालु असल्याचे दिसले. सदर छायाचित्र क्र. १ ते ६ यांना **निशाण क्र. १०४ ते १०९** देण्यात येतो.

**<u>प्रतिवादी १ ते ३ यांचे तर्फे साक्षीदार क्र.०३ यांची उलटतपासणी वादी तर्फे वकील श्री. आर.व्ही.दिवाण यांचे तर्फे शपथेवर सुरु –</u>**

मला फोटो काढण्याचा आदेश देणेकामी प्रतिवादी व देवकर माझे दुकानामध्ये आलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावर प्रतिवादी बळीराम चिंचकर

यांची सही नाही. माझे दुकान व वादातित जागा यामधील अंतर ५०० मिटर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्यावेळी फोटो काढण्यासाठी गेलो होतो त्यावेळी प्रतिवादी चिंचकर तेथे हजर होते. मी गट नं. १९९ चा ७/१२ उतारा स्वत: पाहिलेला नाही. मी गट नं. १९९ मधील मिळकत कोणाच्या नावावरती अथवा कोणाच्या मालकी वरती आहे याची खात्री करुन घेतलेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्या जमिनीचे फोटो काढले त्या जमिनीचा ७/१२ उतारा देवकर अथवा चिंचकर यांना मागणी केलेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्या मिळकतीचा फोटो काढले तिचा गट नं. १९९ च होता या बाबीची खात्री महसुल कार्यालयातून केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी ६ छायाचित्रांच्या पाठीमागे गट नं. १९९ हा कोणत्याही शासकीय दस्ताची खात्री न करता लिहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी छायाचित्राच्या पाठीमाघे गट नं. १९९ हा चिंचकर यांचे सांगण्यानुसार लिहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी एखाद्या ठिकाणचे छायाचित्र काढण्याचा आदेश मिळाल्यानंतर सर्वप्रथम त्याचा गट नंबर, मालकी, व त्याचे चतु:सिमा माहिती घेणे क्रमप्राप्त आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी चिंचकर हे सांगतील असे मी फोटो काढले व त्यांचे सांगण्याप्रमाणे त्याचे फोटो पाठीमाघे लिहिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी मी साक्षी कामी चिंचकर यांचे सांगण्यानुसार आलेलो आहे.

उलटतपास संपला, फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

(एस.एम.घुगे)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा

दि. १३–०३–२०२६